# महाराष्ट्र शासन
## कृषि विभाग
### कृषि आयुक्तालय व विभागीय कार्यालयाअंतर्गत सरळसेवेने भरावयाच्या पदांची जाहिरात
**जाहिरात क्रमांक :- जा.क्र.अेपीटी/१३११/ससेप्र/वर्ग-३,४/प्र.क्र.५२/आस्था-४/२/२०१२, दि ०२/०१/२०१२**

**शासन निर्णय क्रमांक कृषिआ-२५०५/प्र.क्र.५८७/१६ अे दिनांक ९/२/२००७ व शासन पत्र क्र.कृषिआ-१२११ /प्र.क्र.५०/१६ ए दिनांक १५/०४/२०११ नुसार** कृषि विभागामध्ये कृषि आयुक्तालय व विभागीय कार्यालयांतर्गत खाली दर्शविल्याप्रमाणे कृषि सहाय्यकांच्या रिक्त पदावर निश्चित वेतनावर कृषि सेवक आणि नियमित वेतनश्रेणीतील लिपिक, वरिष्ठ लिपिक व सहाय्यक अधिक्षक पदावरील भरतीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी पात्र असलेले महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे उमेदवार अर्ज करु शकतात.

### विभागनिहाय पदसंख्या

**पद क्रमांक १ : कृषि सेवक**

| विभागाचे नाव व रिक्त पदसंखा | | खुला प्रवर्ग | मागास वर्गीयासाठी प्रवर्गनिहाय राखीव पदांची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग |
| **पुणे (एकूण ५६पदे)** | एकूण | ० | * २८ | * २६ | १ | ० | ० | १ | ० | ० |
| समांतर आरक्षण | महिला | ० | ८ | ८ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ४ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडू | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन | ० | ३ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अपंग | **श्रवण शक्तीतील दोष -०१, क्षीणदृष्टी -०१** | | | | | | | | |
| **ठाणे (एकूण ११४ पदे)** | एकूण | ७४ | *२१ | ६ | * ५ | *७ | १ | ० | ० | ० |
| समांतर आरक्षण | महिला | २२ | ६ | २ | २ | २ | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ११ | ३ | १ | १ | १ | ० | ० | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ४ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडू | ४ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन | ७ | २ | १ | ० | १ | ० | ० | ० | ० |
| | अपंग | **श्रवण शक्तीतील दोष -०१, क्षीणदृष्टी -०१ , चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु -०१** | | | | | | | | |
| **नाशिक (एकूण १७५ पदे)** | एकूण | ११७ | *२६ | ८ | ० | ५ | ४ | *९ | ४ | २ |
| समांतर आरक्षण | महिला | ३५ | ८ | २ | ० | २ | १ | ३ | १ | १ |
| | माजी सैनिक | १८ | ४ | १ | ० | १ | ० | १ | ० | ० |
| | प्रकल्पग्रस्त | ६ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | भुकंपग्रस्त | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडू | ६ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन | १२ | ३ | १ | ० | १ | ० | १ | ० | ० |
| | अपंग | **क्षीणदृष्टी -०२, श्रवण शक्तीतील दोष -०३** | | | | | | | | |
| **कोल्हापूर (एकूण २२२ पदे)** | एकूण | १४५ | १५ | *२२ | १ | १ | ० | १ | ३ | ३४ |
| समांतर आरक्षण | महिला | ४४ | ५ | ७ | ० | ० | ० | ० | १ | १० |
| | माजीसैनिक | २२ | २ | ३ | ० | ० | ० | ० | ० | ५ |
| समांतर आरक्षण | प्रकल्पग्रस्त | ७ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | भुकंपग्रस्त | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | खेळाडू | ७ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | अंशकालीन | १५ | २ | २ | ० | ० | ० | ० | ० | ३ |

www.mahaagri.gov.in

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **औरंगाबाद (एकूण ९९ पदे)** | एकूण | **६२** | ***११** | **३** | **१** | **४** | **०** | **१** | **१** | **१६** |
| समांतर आरक्षण | महिला | **१९** | **३** | **१** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **५** |
| | माजी सैनिक | **९** | **२** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **२** |
| | प्रकल्पग्रस्त | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| | भुकंपग्रस्त | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| | खेळाडू | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| | अंशकालीन | **६** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |
| | अपंग | **क्षीणदृष्टी -०१, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु -०१, श्रवण शक्तीतील दोष -०१** | | | | | | | | |
| **लातूर (एकूण २२ पदे)** | एकूण | **११** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **२** | **०** | **७** |
| समांतर आरक्षण | महिला | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |
| | माजी सैनिक | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| | अंशकालीन | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |

**पद क्रमांक २ : लिपिक :**

| विभागाचे नाव व रिक्त पदसंख्या | | खुला प्रवर्ग | मागास वर्गीयासाठी प्रवर्गनिहाय राखीव पदांची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग |
| **पुणे (एकूण २३ पदे)** | एकूण | **२** | **०** | ***७** | **१** | **०** | **४** | **१** | **०** | **८** |
| समांतर आरक्षण | महिला | **१** | **०** | **२** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **२** |
| | माजी सैनिक | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **१** |
| | अंशका लीन | **०** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| | अपंग | **क्षीणदृष्टी -०१** | | | | | | | | |
| **ठाणे (एकूण २३ पदे)** | **एकूण** | **१७** | **३** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |
| समांतर आरक्षण | **महिला** | **५** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| | **माजी सैनिक** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| | **प्रकल्पग्रस्त** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| | **खेळाडू** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| | **अंशकालीन** | **२** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| | अपंग | **श्रवण शक्तीतील दोष -०१** | | | | | | | | |
| **नाशिक (एकूण ६० पदे)** | एकूण | **२५** | **८** | **३** | **३** | **१** | **४** | **२** | **१** | **१३** |
| समांतर आरक्षण | महिला | **१०** | **१** | **१** | **१** | **०** | **१** | **१** | **१** | **४** |
| | माजी सैनिक | **५** | **२** | **१** | **१** | **०** | **१** | **०** | **०** | **३** |
| | प्रकल्पग्रस्त | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| | भुकंपग्रस्त | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| | खेळाडू | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |
| | अंशकालीन | **२** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |
| | अपंग | **श्रवण शक्तीतील दोष -०१** | | | | | | | | |
| **कोल्हापूर (एकूण ४६ पदे)** | एकूण | **१२** | **०** | ***४** | ***२** | ***२** | ***३** | ***३** | ***२** | ***१८** |
| समांतर आरक्षण | महिला | **४** | **०** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **५** |
| | माजी सैनिक | **२** | **०** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **३** |
| | प्रकल्पग्रस्त | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| | खेळाडू | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |
| | अंशकालीन | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **२** |
| | अपंग | **क्षीणदृष्टी -०१** | | | | | | | | |

www.mahaagri.gov.in

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **औरंगाबाद (एकूण १० पदे)** | एकूण | ० | १ | $*_{४}$ | $*_{१}$ | $*_{१}$ | $*_{२}$ | ० | $*_{१}$ | ० |
| समांतर आरक्षण | महिला | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **कृषि आयुक्तालय (एकूण ४९ पदे)** | एकूण | ३१ | ५ | २ | ० | १ | १ | $*_{२}$ | १ | ६ |
| समांतर आरक्षण | महिला | ९ | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | २ |
| | माजी सैनिक | ५ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | प्रकल्पग्रस्त | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | खेळाडू | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अंशकालीन | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भुकंपग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अपंग | **क्षीणदृष्टी -०१** | | | | | | | | |

**पद क्रमांक ३ : वरिष्ठ लिपिक**

| विभागाचे नाव व रिक्तपद संख्या | | खुला प्रवर्ग | मागास वर्गीयासाठी प्रवर्गनिहाय राखीव पदांची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग |
| **पुणे (एकूण ४ पदे)** | एकूण | ३ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| समांतर आरक्षण | महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **ठाणे (एकूण ४ पदे)** | एकूण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| **कोल्हापूर (एकूण ६ पदे)** | एकूण | ३ | ० | १ | ० | $*_{१}$ | $*_{१}$ | ० | ० | ० |
| समांतर आरक्षण | **महिला** | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **नागपूर (६ पदे)** | एकूण | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ |
| समांतर आरक्षण | **महिला** | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

**पद क्रमांक ४ : सहाय्यक अधिक्षक**

| विभागाचे नाव व रिक्तपद संख्या | | खुला प्रवर्ग | मागास वर्गीयासाठी प्रवर्गनिहाय राखीव पदांची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास प्रवर्ग |
| **पुणे (एकूण ४पदे)** | एकूण | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| समांतर आरक्षण | **महिला** | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **नाशिक (एकूण ४पदे)** | एकूण | ० | १ | $*_{१}$ | $*_{१}$ | ० | ० | ० | ० | १ |
| **कोल्हापूर (एकूण४पदे)** | एकूण | १ | $*_{१}$ | ० | ० | ० | ० | ० | ० | $*_{२}$ |
| समांतर आरक्षण | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| **अमरावती (एकूण ४पदे)** | एकूण | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

* यामध्ये अनुशेषाचा समावेश आहे.

**टिप :-**

१) जाहिरातीत नमूद केलेल्या पद संख्येत कमी/अधिक बदल होण्याची शक्यता आहे.

२) महिला, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन कर्मचारी यांचेसाठी आरक्षित असलेली पदे संबधीत वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.

www.mahaagri.gov.in

३) अपंगांसाठी आरक्षीत असलेल्या पदावर सरळसेवेने भरती करतांना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्यांची निवड करण्यांत येईल व भरती केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल त्या उपलब्ध सामाजिक प्रवर्गात सामावून घेण्यात येईल.

४) ज्या उमेदवारांनी सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण/अदिवासी/जिल्हा सैनिक बोर्ड इ. कार्यालयामध्ये नावे नोंदविलेली आहेत त्याचप्रमाणे ज्या उमेदवारांची सदर पदांसाठी सेवायोजन कार्यालयाकडून शिफारस करण्यात आलेली आहे, अशा उमेदवारांनीही या पदासाठीच्या लेखी परिक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक राहील. तसेच परिक्षेसाठीचे विहित शुल्क धनाकर्षाव्दारे भरणे आवश्यक राहील.

**१) विज्ञापित पदाकरीता आवश्यक अर्हता व अटी पुढील प्रमाणे राहतील :**

**१.१) किमान शैक्षणीक अर्हता / वेतनश्रेणी :**

**पद क्रमांक १ : कृषि सेवक**

१.१.१) शासनमान्य संस्था किंवा कृषि विद्यापीठामधील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य म्हणून मान्यता मिळालेली अशी इतर कोणतीही अर्हता धारण केलेली आहे असे उमेदवार.

१.१.२) **वेतन :** निश्चित वेतन रुपये २५००/- दरमहा.

१.१.३) निवड झालेल्या उमेदवारांची कृषि सेवक पदी प्रथमतः १ वर्षासाठी नियुक्ती करण्यात येईल व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे आढळुन आल्यास पुन्हा १ वर्षाची नियुक्ती करण्यात येईल. याप्रमाणे कृषि सेवकपदी नियुक्तीचा कमाल कालावधी ३ वर्षाचा राहील. ३ वर्षाचा कालावधी समाधानकारक पूर्ण केल्यानंतर पदांच्या उपलब्धते प्रमाणे व आवश्यकते प्रमाणे उमेदवारास कृषि सहाय्यकांच्या नियमित पदावर नियुक्ती देण्याचा विचार करण्यात येईल.

**पद क्रमांक २ : लिपिक**

१.१.४) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा ( इयत्ता १० वी ) (एस.एस.सी) उत्तीर्ण झालेले उमेदवार.

१.१.५) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडील मराठी ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि. परीक्षा उत्तीर्ण असलेले उमेदवार

१.१.६) **वेतनश्रेणी :** रुपये ५२००-२०२००/- ग्रेड वेतन १९००/-

**पद क्रमांक ३ : वरिष्ठ लिपिक**

१.१.७) महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी उत्तीर्ण झालेले उमेदवार.

१.१.८) व्दित्तीय श्रेणीतील पदवी धारण करणा-या किंवा पदवीप्राप्त केल्यानंतर मसुदालेखन व पत्रव्यवहाराचा पुर्वानुभव असणा-या उमेदवारास प्राधान्य राहील.

१.१.९) **वेतनश्रेणी :** रुपये ५२००-२०२००/- ग्रेड वेतन २४००/-

**पद क्रमांक ४ : सहाय्यक अधिक्षक**

१.१.१०) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी किमान व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले उमेदवार.

१.१.११) पदवी प्राप्त झालेनंतर किमान ३ वर्षे कालावधीचा मसुदालेखन व पत्रव्यवहाराचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१.१.१२) विधी शाखेची पदवी धारण करणा-या उमेदवारास प्राधान्य.

१.१.१३) **वेतनश्रेणी :** रुपये ९३००-३४८००/- ग्रेड वेतन ४२००/-

**१.२) वयोमर्यादा :**

**१.२.१)** सर्वसाधारण उमेदवारांकरीता दिनांक **०३/०१/२०१२** रोजी वय किमान १८ वर्ष व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना उच्च वयोमर्यादा ५ वर्ष शिथीलक्षम राहील.

**१.२.२)** अपंग, माजी सैनिक, स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य, प्रकल्पग्रस्त, भुंकपग्रस्त, खेळाडू, अंशकालीन उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा शासन नियमानुसार शिथीलक्षम राहील.

**१.३) खेळाडूसाठी अर्हता :**

१.३.१) खेळाडू या समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कास्य पदक प्राप्त करणारा खेळाडू.

१.३.२) राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात

येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळांडूचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.

१.३.३) राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (एनसीसी) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेले उमेदवार.

१.३.४) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत गटातील व्यक्ती / कुटुंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू सदस्यांना खेळाडूंसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

१.३.५) इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) यांचेकरीता उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गट (क्रिमीलेअर) बाबत सामाजिक विभागाने वेळोवेळी निश्चित केलेले नियम व अटी लागू राहतील. उन्नत व प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यासाठी शासनाने जाहिर केलेल्या सक्षम प्राधिका-याचे असावे.

**१.४) अपंग :** अपंग प्रवर्गातील उमेदवारांसाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असून तसे संबंधित जिल्हा शासकीय रुग्णालय अथवा प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र साक्षांकीत करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

**१.५) परिक्षा शुल्क :**

१.५.१) सर्वसाधारण (खुला प्रवर्गातील) उमेदवारांकरिता **रुपये ४००/-** व मागासवर्गीयासाठी **रु.२००/-** परीक्षा शुल्क राहील.

१.५.२) अर्जासोबत प्रस्तुत जाहिरातीमधील **अनुक्रमांक -३** मध्ये दर्शविण्यात आलेल्या अधिका-यांचे नांवे देय असलेला परिक्षा शुल्कापोटीचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft) त्या, त्या विभागात देय असणारा जोडणे आवश्यक राहील. धनाकर्षाच्या पाठीमागे उमेदवाराने आपले संपुर्ण नांव,पत्ता व प्रवर्ग नमुद करावा.

१.५.३) अपंग व माजी सैनिक यांना परीक्षा शुल्क भरण्यापासून सुट देण्यात आलेली आहे.

**२) अर्ज करण्याची पध्दत :**

२.१. प्रस्तुत पदभरतीसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेले अर्ज स्वीकारण्यात येतील.

२.२. ज्या पदासाठी व विभागात उमेदवाराने अर्ज केला असेल, त्या ठिकाणी उमेदवारास पात्रतेच्या अधिन राहून लेखी परिक्षेस बसता येईल.

२.३. पात्र उमेदवारांना वेब बेस्ड (**Web-Based**) ऑनलाईन अर्ज www.mahaagri.gov.in या संकेतस्थळाव्दारे दि. ०३/०१/२०१२ ते दि. १८/०१/२०१२ या कालावधीमध्ये भरणे आवश्यक राहील.

२.४ अर्ज करण्याकरीता कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या संकेतस्थळावर पहिल्या पानाच्या (Home Page) उजव्या बाजूस ऑनलाईन रिक्रुटमेंट (Online Recruitment) यावर क्लीक केल्यानंतर ऑनलाईन अर्ज उपलब्ध हाईल. अर्ज भरण्यासाठी उमेदवारास ऑनलाईन अर्जासोबत मदतीव्दारे (**Help**) सुचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

२.५ उमेदवाराला कोणत्याही इंटरनेट सुविधा असलेल्या केंद्रावरुन अर्ज भरता येईल.

२.६ वरील १.५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी आवश्यक रकमेचा धनाकर्ष **(D.D.)** स्वतः जवळ तयार ठेवावा, म्हणजे उमेदवारास ऑनलाईन अर्ज भरतांना परिक्षा शुल्काबाबतची माहिती त्यामध्ये भरता येईल.

२.७ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (**Latest**) फोटो असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व फोटो विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

२.८ स्वाक्षरी स्कॅन करुन स्वाक्षरीसाठी दिलेल्या ठिकाणीच उमेदवाराने ती अपलोड करावी. फोटो व स्वाक्षरी एकत्र स्कॅन करु नये. तसेच उमेदवाराने छायाचित्रावर स्वाक्षरी करु नये.

२.९ स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी प्रवेशपत्र, हजेरीपट व तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परिक्षेच्या वेळी अथवा अन्य कोणत्याही कारणाच्या वेळी अर्ज भरतांना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई केली जाईल.

www.mahaagri.gov.in

२.१० ऑनलाईन पध्दतीने एकदा भरलेल्या अर्जामधील कोणत्याही प्रकारच्या बदलाची विनंती विचारात घेतली जाणार नाही, अथवा अशा विनंतीस उत्तरेही दिली जाणार नाहीत.

२.११ उमेदवाराने ऑनलाईन भरलेल्या अर्जाची संगणकीय प्रत काढून, त्या अर्जाची प्रत परिक्षा शुल्कापोटीचा आवश्यक रकमेचा धनाकर्ष व खालील नमुद केलेल्या आवश्यक कागदपत्रांच्या सक्षम अधिका-याने साक्षांकित केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती अर्जासोबत जोडून प्रस्तुत जाहिरातीमधील **अनुक्रमांक -३** मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे संबंधित विभागीय कार्यालयाकडे समक्ष अथवा पोष्टाव्दारे दिनांक २८/०१/२०१२ पर्यंत पाठविण्यात यावा.

**२.१२ अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशिल.**

२.१२.१) शैक्षणीक अर्हता धारण करीत असल्याबाबतचे संबंधित बोर्ड/विद्यापीठाचे प्रमाणपत्रची प्रत.

२.१२.२) शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा मंडळाकडील टंकलेखन अर्हतेबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत.

२.१२.३) जन्मतारखे बाबतच्या पुराव्यादाखलच्या प्रमाणपत्राची प्रत

२.१२.४) अनुभवाचे प्रमाणपत्राची प्रत.

२.१२.५) सक्षम प्राधिका-यांने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जाती वैधता प्रमाणपत्र.

२.१२.६) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतच्या सक्षम प्राधिका-यांने दिलेल्या प्रमाणपत्राची प्रत.

२.१२.७) प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्राची प्रत

२.१२.८) लागू असल्यास सक्षम प्राधिका-यांने दिलेल्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची प्रत.

२.१२.९) अपंगांचे बाबतीत जिल्हा शासकीय रुग्णालयाचे अथवा वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्राची प्रत.

२. १२.१०) खालील दिलेल्या नमुन्यातील लहान कुटुंबाबाबतचे प्रमाणपत्र.

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ**

**प्रतिज्ञापन**

**नमुना-अ (नियम-४ पहा)**

मी श्री. / श्रीमती / कुमारी ........................................श्री................................................ यांचा मुलगा / यांची मुलगी / यांची पत्नी वय ..........................वर्ष, राहणार ........................ याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी .................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ....................(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ................ आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे यापदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :------------**

**दिनांक :------------**

**उमेदवाराची सही**

(उमेदवाराचे नांवः.......................................)

www.mahaagri.gov.in

**३) ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जाची प्रत सादर करणे व ज्या विभागासाठी अर्ज करावयाचा आहे त्या विभागातील ज्याचे नांवे धनाकर्ष काढावयाचा आहे त्याचा सविस्तर तपशिल.**

| अ. क्र. | विभाग | ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे विभाग / कार्यालयाचे नांव व पत्ता | आवेदन शुल्क रक्कमेचा धनाकर्ष (D.D.) ज्या नावाने काढावयाचा आहे त्याचे नाव |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | पुणे | विभागीय कृषि सह संचालक,पुणे विभाग पुणे, कृषिभवन, शिवाजीनगर पुणे-४११००५ | **Accounts officer, Divisional Joint Director of Agriculture, Pune** |
| २. | ठाणे | विभागीय कृषि सह संचालक कोकण विभाग ठाणे, वागळे इस्टेट, रोड नंबर-१६ झेड लेन, ठाणे-४००६०४ | **Accounts officer, Divisional Joint Director of Agriculture, Thane** |
| ३. | नाशिक | विभागीय कृषि सह संचालक, नाशिक विभाग नाशिक, जुने महसूल आयुक्त कार्यालय परिसर, सेक्युरीटी प्रेस रोड, नाशिक रोड, नाशिक- ४१२१०१ | **Accounts officer, Divisional Joint Director of Agriculture, Nasik** |
| ४. | कोल्हापूर | विभागीय कृषि सह संचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर,लाईन बाजार, कोल्हापूर - ४१६००३ | **Accounts officer, Divisional Joint Director of Agriculture, Kolhapur** |
| ५. | लातूर | विभागीय कृषि सह संचालक, लातूर विभाग लातूर, कलेक्टर कचेरी जवळ, लातूर -४१३५१२ | **Accounts officer, Divisional Joint Director of Agriculture, Latur** |
| ६. | औरंगाबाद | विभागीय कृषि सह संचालक, औरंगाबाद विभाग औरंगाबाद, अदालत रोड, क्रांतीचौक, औरंगाबाद ४३१००१ | **Accounts officer, Divisional Joint Director of Agriculture, Aurangabad** |
| ७. | अमरावती | विभागीय कृषि सह संचालक, अमरावती विभाग अमरावती,रायली प्लॉट, जयस्तंभ चौक, अमरावती -४४४६०१ | **Accounts officer, Divisional Joint Director of Agriculture, Amravati** |
| ८. | नागपूर | विभागीय कृषि सह संचालक नागपूर विभाग नागपूर, प्रशासकीय इमारत क्र.२, ७ वा मजला, अे.व्ही.सिव्हिल लाईन, नागपूर-४४३०००१ | **Accounts officer, Divisional Joint Director of Agriculture, Nagpur** |
| ९. | कृषि आयुक्तालय | आयुक्त, कृषि, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-४११००१ | **Assistant Director, Commissionarate of Agriculture, Maharashtra State, Pune-411001** |

**४) निवडीची पध्दत :**

**४.१) <u>पद क्रमांक</u> : १ कृषि सेवक :**

४.१.१) उपरोक्त पदासाठी फक्त लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल.

उक्त पदाकरीता २०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षा मराठी -२० गुण, इंग्रजी -२० गुण, सामान्यज्ञान - २०, गुण, बौध्दीक चाचणी - २० गुण व कृषि विषय - १२० गुण अशा एकूण २०० गुणांची राहील परिक्षा त्या, त्या विभागाच्या कार्यक्षेत्रात घेण्यात येईल. प्रश्नपत्रीका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

४.१.२) पात्र उमेदवारांना परिक्षा केंद्र, प्रवेशपत्र व परिक्षे विषयी सुचना स्वतंत्रपणे पत्राव्दारे कळविण्यात येतील व संकेतस्थळावरही उपलब्ध करण्यात येईल. संकेतस्थळावरुन काढलेले प्रवेशपत्र लेखी परिक्षेसाठी ग्राहय धरण्यात येतील. लेखी परिक्षे नंतर गुणवत्ता यादी गुणानुक्रमे व प्रवर्गनिहाय तयार करुन कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४.१.३) नियुक्तीपुर्वी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना आवश्यक मुळ कागदपत्रांची तपासणी करुनच नियुक्ती देण्यात येईल.

www.mahaagri.gov.in

**४.२ ) <u>पद क्रमांक २ ते ४</u> : लिपीक, वरीष्ठ लिपीक व सहाय्यक अधिक्षक**

४.२.१) उपरोक्त पदासाठी फक्त लेखी परिक्षा घेण्यात येतील. लेखी परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार प्रवर्गनिहाय त्यांची निवड केली जाईल.

४.२.२) लिपीक संवर्गीय पदासाठी लेखी परीक्षा २०० गुणांची असेल प्रश्नपत्रीका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची असेल.

. ज्या पदाकरीता कमीत कमी अर्हता माध्यमीक शालांत परिक्षा (१० वी) आहे अशा पदांकरीता परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल. ज्या पदांकरीता पदवी ही कमीत कमी अर्हता आहे अशा पदांकरीता परीक्षेचा दर्जा मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परिक्षेच्या दर्जाच्या समान राहील, परंतू मराठी या प्रश्नपत्रीकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परिक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील. लेखी परिक्षेला **मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी** या विषयावरील प्रश्नाकरीता **प्रत्येकी ५० गुण** ठेवून एकूण २०० गुणांची परिक्षा घेण्यात येईल.

४.२.३) नियुक्तीपुर्वी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना आवश्यक मुळ कागदपत्रांची तपासणी करुनच नियुक्ती देण्यात येईल.

**४.३)** उपरोक्त पदांसाठी घेण्यात येणारी लेखी परिक्षा शक्यतो एकाच दिवशी **सकाळ सत्रात कृषि सेवक** व दुपार **सत्रात लिपीक संवर्गीय** पदांसाठी या प्रमाणे संबंधित विभागाच्या कार्यक्षेत्रात घेण्यात येईल. लेखी परिक्षेस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**५) इतर अटी व शर्ती :**

५.१) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

५.२) ऑन लाईन अर्जाच्या सादर करण्यात आलेल्या प्रतीची छाननी करुन पात्र उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी प्रवेशपत्र पाठविण्यात येईल व प्रवेशपत्र संकेतस्थळावरही उपलब्ध होईल.

५.३) मागासवर्गीयांसाठी असलेले आरक्षण हे केवळ महाराष्ट्राचे रहिवासी असलेल्यांसाठी लागू राहतील. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे आवश्यक राहील.

५.४) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुंटुंबातील (क्रिमिलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय रहाणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ति अथवा गटातील महिला सदस्यांना ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. म्हणजेच महिलांसाठी राखीव पदावर जे उमेदवार मागणी करतील त्यांनी उन्नत व्यक्ती / गट (क्रिमिलेअर) मध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५.५) अनुसूचित जाती व जमाती व्यतिरिक्त विजा-अ, भज-ब, भज-ड तसेच इतर मागास आणि विशेष मागास प्रवर्ग यांना उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागु करण्यात आले असल्याने, त्याबाबतची प्रमाणपत्रे (नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र) (सन २०११-१२ साठी वैध असलेले) सादर केल्याशिवाय नियुक्तीसाठी निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

५.६) भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी/जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले व उमेदवारांचे नांव नमूद केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. भुकंपग्रस्त उमेदवारासाठी राखीव असलेली पदे लातूर/ उस्मानाबाद जिल्हयातील ५२ बाधीत गावातील उमेदवारामधून भरण्यात येतील.

राज्यातील कोणत्याही जिल्हयातील प्रकल्पग्रस्त उमेदवार नियुक्तीसाठी राज्य स्तरावरील कार्यालयामध्ये उपलब्ध पदांसाठी अर्ज करु शकतील. मात्र विभागीय कार्यालयातील पदांसाठी त्या,त्या विभागांतर्गत असलेल्या जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांचाच नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. या साठी प्रस्तुत जाहिरातीमध्ये दर्शविल्यानुसार, विभागनिहाय उपलब्ध पदांसाठी विभागांतर्गत असलेल्या जिल्हयातील प्रकल्पग्रस्तच संबंधित विभागाकडे अर्ज करु शकतील.

५.७) माजी सैनिक या आरक्षीत पदासाठी उमेदवार स्वतः माजी सैनिक असावा. माजी सैनिकामधुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे त्या त्या सामाजीक प्रवर्गातील उमेदवारामधुन भरण्यात येतील.

५.८) उमेदवाराने अर्जामध्ये नमूद केलेली माहिती कोणत्याही टप्यावर चूकीची अथवा खोटी आढळून आल्यास उमेदवाराची संबधीत पदासाठीची उमेदवारी रद्द करण्यात येईल व संबंधित उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. चूकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास कोणतीही पूर्व सूचना/नोटीस अथवा कारण न देता उमेदवार तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील. त्यामुळे होणा-या सर्व परिणामास उमेदवार स्वतः जबाबदार राहील.

www.mahaagri.gov.in

५.९) लेखी परीक्षेस पात्र उमेदवारांना परीक्षेचा दिनांक, परीक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ. बाबतची माहिती पोष्टाव्दारे कळविण्यात येईल. तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. लेखी परीक्षा केवळ मराठी माध्यमातून घेतली जाईल.

५.१०) नियुक्तीस पात्र ठरलेल्या मागासप्रवर्गातील उमेदवारांना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि. १२/१२/२०११ मधील तरतूदीनुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५.११) शासकीय सेवेत नियमानुसार नियुक्ती झाल्यानंतर उमेदवाराला नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

५.१२) सामाजिक आरक्षणांतर्गत असलेले महिला, खेळाडू व अंशकालीन कर्मचारी या प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या-त्या सामाजिक प्रवर्गातील उमेदवारामधून भरण्यात येतील.

५.१३) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये उमेदवारांनी दि.२८/०३/२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील. अर्जदार यांना हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी उमेदवार निवडीस / नियुक्तीस अपात्र ठरविला जाईल.

**६) खालील त्रुटी असलेले अर्ज नाकारण्यात येतील :**

६.१) विहित किमान अर्हता / पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज

६.२) आवश्यक रकमेचा धनाकर्ष न जोडलेले अर्ज.

**७)** उमेदवारांचा अर्ज कोणत्याही त्रुटीमुळे रद्द करण्यात आल्यास उमेदवारास कळविण्यात येणार नाही.

**८)** निवड प्रक्रियेच्या संदर्भात सर्व अधिकार निवड समितीने राखून ठेवले आहेत.

**९)** निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर कोणताही प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**१०)** अंतीम दिनांकानंतर कोणताही अर्ज कोणत्याही कारणास्तव स्वीकारला जाणार नाही.

**११)** सदरची जाहीरात कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

पुणे : ४११ ००१
दिनांक : ०२/०१/२०१२

स्वाक्षरीत/-
(उमाकांत दांगट)
**आयुक्त कृषि,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१.**

माहितीसाठी संपर्क दूरध्वनी क्रमांक - ०२० - २५५१२८११
०२० - २५५१०९७८

www.mahaagri.gov.in